कार्यालय,सहा.महाप्रबंधक (एनओएफएन)
टेलीफोन भवन, जिल्हा पेठ, जलगांव.
O/o, ASST. GENERAL MANAGER (NOFN)
Telephone Bhavan, Jilha Peth, Jalgaon.

भारत संचार निगम लिमिटेड
(भारत सरकार का उपक्रम)
BHARAT SANCHAR NIGAM LIMITED
(A Govt. of India Enterprise)

पत्र क्र. नोफन-जळगाव/फोरेस्ट परवानगी/रावेर ब्लोक /२०१८-१९/०१ दिनांक ०६/१०/२०१८

प्रति,

मा. मुख्य वनरक्षक तथा क्षेत्र संचालक साहेब,
यावल / रावेर वन्यजीव ,वन विभाग, जिल्हा जळगाव.
(सहाय्यक वन संरक्षक यावल यांचे मार्फत)

विषय: - नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) प्रकल्पातून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीना ऑप्टीकल फायबर केबलने जोडण्या करिता रावेर व यावल तालुक्यातील वन्यजीव वन क्षेत्रामधून प्रस्तावित नवीन ओएफसी रूटला परवानगी मिळणेबाबत....

संदर्भ: - १.या कार्यालयाचे पत्र क्र. T-54/NOFN/OFC Tender/Raver Block/2017-18/39 दिनांक १६/०२/२०१८
२. या कार्यालयाचे ओंन लाईन प्रस्ताव क्र. FP/MH/OFC/46687/2020 मध्ये दुरुस्तीबाबत

मा. महोदय,

केंद्र शासनाने नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) या योजने अंतर्गत देशातील सर्व ग्रामपंचायतीना ऑप्टीकल फायबर केबल यंत्रणेतून ब्रोडबॅंड इंटरनेट सुविधा पुरविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला असून सदर प्रकल्प भारत सरकार व भारत ब्रोडबॅंड नेटवर्क लिमिटेड (BBNL) यांचे वतीने भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांचे मार्फत राबविण्यात येणार आहे.

या योजने अंतर्गत जळगाव जिल्यातील रावेर व यावल या तालुक्यातील वन्यजीव वनक्षेत्रामधून जाणाऱ्या प्रस्तावित ओएफसी रूटसाठी परवानगी मिळण्या संदर्भातविहित विहित नमुन्यातील अर्ज सम्बन्धित नकाशासह आपल्या विभागास ऑफ लाईन पद्धतीने सदर केलेला आहे.

सादर प्रस्ताव पारित होणेसाठी ओंन लाईन पद्धतीने अर्ज क्र. FP/MH/OFC/46687/2020 आपल्या परिवेश संकेत स्थळावरून सदर करण्यात आला होता. सदरहु प्रस्तावत काही त्रुटी असल्याचे ई – मेल आपल्या कार्यालयकडून प्राप्त झाले. त्या अनुषंगाने प्रस्तावात बदल करणेची प्रक्रिया या कार्यालयाकडून करण्यात आली. परंतु, वन्यजीव वनक्षेत्र व वन्यजीव वानाक्षेत्राबाहेरील एकूण व्याप्त क्षेत्र याबाबत बदल करण्याचे अधिकार (Privileges) या कार्यालायचे लॉगीन मध्ये देण्यात आलेले नाही.

त्या अनुषंगाने सदरील क्षेत्राबाबतचे विवरण खालील प्रमाणे,

| अ.क्र. | क्षेत्र (हेक्टर) | प्रस्तावात नमूद (हेक्टर) | सुधारित बदल (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १. | प्रकल्पासाठी लागणारे एकूण क्षेत्र | ०.००७१७७५ | ०.००८६४७५ |
| २. | प्रकल्पासाठी लागणारे एकूण वनक्षेत्र | ०.००१४६३ | ०.००७१७७५ |
| ३. | प्रकल्पासाठी लागणारे एकूण वन्यजीव वनक्षेत्र (Yawal Wildlife Sanctuary – Wildlife Forest area – Protected zone) | ०.००१४६३ | ०.००१४६३ |
| ३. | वन्यजीव वनक्षेत्राबाहेरील वन परिसर (Non-Protected Forest area) | ०.००५७१४५ | ०.००५७४५ |
| ४. | प्रकल्पासाठी लागणारे वनक्षेत्रा व्यतिरिक्त परिसर (Non Forest Area) | निरंक | ०.००१४७ |

Scanned with CamScanner

वनक्षेत्र क्षेत्रफळा बाबतचे सदरील बदल आपल्या परिवेश संकेत स्थळावर करणे बाबतचे अधिकार या कार्यालयास नसल्यामुळे ऑनलाईन प्रस्तावात सुधार करणे शक्य नाही. तरी आपण उपरोल्लेखित बदल संदर्भीय ऑन लाईन प्रस्तावात आपल्या कार्यालामार्फत करण्यात यावे हि विनंती. या व्यतिरिक्त Toposheet व Geographical Map संबंधित बदल करण्यासाठीचे पर्याय ऑन लाईन प्रस्तावत खुले असल्याने सदर बदल करण्यात आलेले आहेत.

सदर परवानगी मिळणेसाठी आपल्या कार्यालयामार्फत योग्यती कार्यवाही करण्यात यावी हि नम्र विनंती.
धन्यवाद.

आपला विश्वासू

(श्री. एन. डी. शिंपी)

सहाय्यक महाप्रबंधक (नोफन), जळगाव
सहाय्यक महाप्रबंधक (र
महाप्रबंधक दूरसंचार का क
जलगांव

Scanned with CamScanner